# प्रेसनोट

दि. २२/१०/२०२३

भिगवन पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथील पोलीस उपनिरीक्षक व खाजगी इसम वकील यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | भिगवन पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ, १२. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४१ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) प्रवीण सुग्रीव लोकरे, वय ५२ वर्ष, पद - पोलीस उपनिरीक्षक (वर्ग-२), नेमणुक - भिगवन पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण.<br>२) मधुकर विठ्ठल कोरडे, वय ३४ वर्ष, व्यवसाय - वकील, रा. मिरजगांव, ता. कर्जत, जि. अहमदनगर. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | २०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २०,०००/- रुपये (वीस हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | १५/१०/२०२३ व दि. १६/१०/२०२३ |
| सापळा दिनांक | २२/१०/२०२३ |

ठिकाण :- भिगवन पोलीस स्टेशन समोर, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या वडीलांचे माहे जुन २०२३ मध्ये अपघाती निधन झाले असून सदर प्रकरणाचा तपास भिगवन पो.स्टे. चे पोलीस उपनिरीक्षक प्रविण लोकरे करीत होते. तक्रारदार यांचे वडीलांना धडक देणा-या वाहनाची इन्शुरन्सची कागदपत्रे व दाखल गुन्ह्यातील इतर कागदपत्रे देण्यासाठी लोकसेवक प्रविण लोकरे यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/- रुपये लाच मागणी केली होती. त्यावेळी तक्रारदार यांचेसोबतचे वकील मधुकर कोरडे यांनी देखील लोकसेवक प्रविण लोकरे यांना पैसे द्यावे लागतील असे सांगितल्याने, तक्रारदार यांनी लोकसेवक प्रविण लोकरे व वकील मधुकर कोरडे यांनी ३०,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक क्र. १ प्रविण लोकरे व आरोपी क्र. २ वकील मधुकर कोरडे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे वडीलांना धडक देणा-या वाहनाची इन्शुरन्सची कागदपत्रे व दाखल गुन्ह्यातील इतर कागदपत्रे देण्यासाठी ३०,०००/- रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी करुन, तडजोडीअंती २०,०००/- रुपये लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी केली. लोकसेवक प्रविण लोकरे यांचेकरीता खाजगी इसम आरोपी क्र. २ वकील मधुकर कोरडे यांनी तक्रारदार यांचेकडून रक्कम रुपये २०,०००/- (विस हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारुन लोकसेवक प्रविण लोकरे यांचे लाच मागणीस प्रोत्साहन दिले. म्हणुन त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध भिगवन पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विरनाथ माने तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.